# प्रेस नोट

ला.प्र.वि,वाशिम.
दि.१६/०१/२०२६

आरोपी लोकसेवक, रविंद्र रंगनाथ खुडे ,वय ४९ वर्षे, पद– तलाठी साजा मंगरूळपीर, जि.वाशिम रा. खंडोबाचौक आर के बिल्डर्स कृष्णा अपार्टमेंट नांदेड, ह.मु. जांब रोड मुळे यांचा वाडा मंगरूळपीर जि.वाशिम यांनी लाच मागणी केल्याने आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंध विभाग/घटक | अमरावती परीक्षेत्र विभाग.<br>घटक वाशिम |
| पोलीस ठाणे गुन्हा नोंद कमांक | पोलीस स्टेशन मंगरूळपीर जि.वाशिम गु.र.नं. २४/२०२६ . |
| कलम व गुन्हा दाखल दिनांक | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे दिनांकः–१५/०१/२०२६ |
| आरोपी लोकसेवक नाव, वय, कार्यलय पत्ता | रविंद्र रंगनाथ खुडे वय ४९ वर्षे, पद– ग्राम महसुल अधिकारी मंगरूळपीर, जि.वाशिम रा. खंडोबाचौक आर के बिल्डर्स कृष्णा अपार्टमेंट नांदेड, ह.मु. जांब रोड मुळे यांचा वाडा मंगरूळपीर जि.वाशिम |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १५,०००/–रूपये लाचेची मागणी करून १०,०००/–रूपये स्वीकारले |
| स्विकारलेली लाचेची रक्कम. | १०,०००/–रूपय |
| थोडक्यात हकिकत. | प्रस्तुत गुन्हयातील हकिकत अशी की, यातील तक्रारदार यांनी दिनांक १५/०१/२०२६ रोजी लेखी तक्रार दिली की, रविंद्र रंगनाथ खुडे ,वय ४९ वर्षे, पद– ग्राम महसुल अधिकारी मंगरूळपीर, जि.वाशिम यांनी तक्रारदार यांना त्यांचे आई चे नावावर असलेली शेत जमीन स्वत:चे नावावर करण्याकरीता तक्रारदार हे आलोसे यांचे कार्यालय जांब रोड मंगरूळपीर येथे गेले असता आलोसे यांनी जमीन नावावर करण्यासाठी १५,०००/– रुपये लाचेची मागणी केली. सदर तक्रारीवरून दिनांक १५/०१/२०२६ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान आलोसे रविंद्र रंगनाथ खुडे,वय ४९ वर्षे, पद– ग्राम महसुल अधिकारी, जि.वाशिम यांनी तक्रारदार यांना सदर जमीन त्यांचे नावावर करण्यासाठी १५,०००/– रुपये लाचेची मागणी करून स्वीकरण्याचे मान्य केलयाने आज रोजी सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांनी लाच रक्कम १५,०००/–रूपया पैकी पहीला हप्ता लाच रक्कम १०,०००/– स्विकारल्याने सरकार तर्फे फिर्यादी पो.नि.ए.एम. गायकवाड यांचे फिर्यादीवरून रविंद्र रंगनाथ खुडे ,वय ४९ वर्षे, पद– ग्राम महसुल अधिकारी मंगरूळपीर, जि.वाशिम यांचे विरूध्द लाच मागणी प्रकरणात गुन्हा नोंद करण्याची कार्यवाही सुरू आहे. |
| सापळा कारवाई | १).पोलीस निरीक्षक ए.एम.गायकवाड ला.प्र.वि. वाशिम. मो.क्र.८३२९०३३१७७<br>२)**पर्यवेक्षण व तपास अधिकारी** –पोलीस उप अधिक्षक जगदीश परदेशी मो.क्र.७५०७०५५२०२<br>३).पो.हवा.नितीन टवलारकर ४) पो.हवा/विनोद अवगळे ५) पो.हवा/योगेश खोटे<br>६).पो.शि.महेश परमेश्वरे,७). चापोशि.नावेद शेख. / चापोशि.मंगेश देवकते |
| मार्गदर्शन | **१).मा.श्री बापु बांगर, पोलीस अधिक्षक ला.प्र.वि अमरावती, परीक्षेत्र अमरावती**<br>**२).मा.श्री सचिन्द्र शिंदे, अप्पर पोलीस अधिक्षक ला.प्र.वि अमरावती, परीक्षेत्र अमरावती** |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम तर्फे नागरीकांना आवहान करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी कामी माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोक सेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेशी संपर्क करावा संपर्क पत्ता– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय वाशिम डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, एल.आय.सि. बिल्डींगच्या पाठीमागे वाशिम.

संकेत स्थळ- **acbmaharashtra.gov.in**
ईमेल- 1. **dyspacbwashim@mahapolice.gov.in, 2. dyspacbwsm@gmail.com**
ऑनलाईन तक्रार- **acbmaharashtra.net**
टोलफ्री कमांक-१०६४/९९२२६७१०६४
दुरध्वनी कमांक-०७२५२-२३५९३३,
व्हॉस्टअप कमांक-९९२२६७१०६४

**जगदीश परदेशी**
**पोलीस उपअधिक्षक ला.प्र.वि.**
**वाशिम जिल्हा वाशिम**